**"मार्च २०१९" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(क) <u>शासन निर्णय / अधिसूचना</u>**

- दिनांक १४ मार्च २०१९ च्या शासन निर्णयान्वये यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे या संस्थेस ए-४, २०७० इतर प्रशासकीय सेवा, ००-००३ प्रशिक्षण (००)(१२) यशदा, पुणे या संस्थेस परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सहायक अनुदान (२०७००८७१), ३६-सहायक अनुदान (वेतन) या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात दुसऱ्या हप्त्याप्रित्यर्थ रु.१,३२,४७४/- इतका निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १९ मार्च २०१९ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील चौरस उपाहारगृहाच्या आस्थापनेवरील ७ अस्थायी पदे दिनांक ३० सप्टेंबर २०१९ पर्यंत पुढे चालू ठेवण्यात आली आहेत.
- दिनांक १९ मार्च २०१९ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील मंत्रालय उपाहारगृहाच्या आस्थापनेवरील २७ अस्थायी पदे दिनांक ३० सप्टेंबर २०१९ पर्यंत पुढे चालू ठेवण्यात आली आहेत.
- दिनांक १९ मार्च २०१९ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील विभानभवन उपाहारगृहाच्या आस्थापनेवरील ९ अस्थायी पदे दिनांक ३० सप्टेंबर २०१९ पर्यंत पुढे चालू ठेवण्यात आली आहेत.
- दिनांक १९ मार्च २०१९ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील कोकणभवन उपाहारगृहाच्या आस्थापनेवरील १५ अस्थायी पदे दिनांक ३० सप्टेंबर २०१९ पर्यंत पुढे चालू ठेवण्यात आली आहेत.
- दिनांक २७ मार्च २०१९ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा आकृतीबंधामध्ये समाविष्ट असलेली ५९ पदे व आकृतीबंधात समाविष्ट नसलेली ४६ पदे अशी एकूण १०५ अस्थायी पदे दिनांक ३० सप्टेंबर २०१९ पर्यंत पुढे चालू ठेवण्यात आली आहेत.
- दिनांक २७ मार्च २०१९ च्या शासन निर्णयान्वये यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या संस्थेस उर्वरित कालावधीकरिता (प्रशिक्षण शुल्क) म्हणून अनिवार्य खर्चासाठी रु.८०.०० लाख इतका निधी सहायक अनुदान (अंतिम हप्ता) म्हणून मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक २७ मार्च २०१९ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत मंजूर तरतुदीतून राज्य प्रशक्षिण नियंत्रण व मुल्यमापन यंत्रणा, यशदा, पुणे, ६ विभागीय व ३६ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांना उर्वरित कालावधीकरिता (प्रशिक्षण शुल्क) म्हणून अनिवार्य खर्चासाठी रु.४,८८,८४,०००/- इतका निधी सहायक अनुदान (अंतिम हप्ता) म्हणून मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक २८ मार्च २०१९ च्या शासन निर्णयान्वये यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या संस्थेमार्फत महाराष्ट्र धोरण संशोधनाच्या बाबींवर सन २०१७-१८ व २०१८-१९ या आर्थिक वर्षात झालेल्या कार्यालयीन खर्चाकरिता रु.५०.०० लाख इतक्या रकमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येऊन, यशदा, पुणे या संस्थेस सहायक अनुदान म्हणून वितरित करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.
- दिनांक ३० मार्च २०१९ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेस संस्थेस विकास प्रशिक्षण व तद्नुषंगिक खर्चासाठी वेतनेतर रु.४.०० लाख इतके अनिवार्य ३१-सहायक अनुदान (वेतनेतर) मंजूर करण्यात आले आहे.
- दिनांक ३० मार्च २०१९ च्या शासन ज्ञापनान्वये सरळसेवा सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा २०१७ अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने प्रतिक्षायादीतील शिफारस केलेल्या १३ उमेदवारांचे मंत्रालयीन प्रशासकीय विभागीय सहायक कक्ष अधिकारी पदावर नियतवाटप करण्यात आले आहे.

- दिनांक ३० मार्च २०१९ च्या शासन ज्ञापनान्वये लिपिक-टंकलेखक (मराठी / इंग्रजी) परीक्षा २०१७ अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने प्रतिक्षायादी क्रमांक-१ मधून शिफारस केलेल्या ६ उमेदवारांचे बृहन्मुंबईतील कार्यालयातील लिपिक-टंकलेखक पदावर नियतवाटप करण्यात आले आहे.
- दिनांक ३० मार्च २०१९ च्या शासन ज्ञापनान्वये लिपिक-टंकलेखक (मराठी / इंग्रजी) परीक्षा २०१७ अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने प्रतिक्षायादीतील शिफारस केलेल्या ३ उमेदवारांचे मंत्रालयीन विभागातील लिपिक-टंकलेखक पदावर नियतवाटप करण्यात आले आहे.

**(क) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त**

- भारतीय प्रशासन सेवेतील ७५ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- सहसचिव-१, उपसचिव-१, अवर सचिव-१, लिपिक-टंकलेखक-१ अशा ४ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

**(ख) पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक**

- वाहनचालक-२, शिपाई-४ अशा ६ कर्मचाऱ्यांना लिपिक-टंकलेखक पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात आली आहे.

**(ग) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन**

- सहसचिव-१, अवर सचिव-१, कक्ष अधिकारी-१ अशा ३ अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे.
- उपसचिव-१, अवर सचिव-१, कक्ष अधिकारी-१ अशा ३ अधिकाऱ्यांचे प्रत्यावर्तन करण्यात आले.
- उपसचिव-१, अवर सचिव-१, निवडश्रेणी लघुलेखक-१ अशा ३ अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.
- सहायक कक्ष अधिकारी-२, लिपिक-टंकलेखक-१ अशा ३ कर्मचाऱ्यांच्या सेवेस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(घ) ज्येष्ठतासूची**

- दिनांक १४ मार्च २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गाचया सन १९८७ ते १९९५ या कालावधीतील दिनांक १ जानेवारी रोजीची सुधारित तात्पुरती ज्येष्ठतासूची हरकती / सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २५ मार्च २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील ७ निवडश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०१९ रोजीची तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २५ मार्च २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील ५ वरिष्ठ स्वीय सहायकांची दिनांक १ जानेवारी २०१९ रोजीची तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २५ मार्च २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील २७ उच्चश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०१९ रोजीची तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २५ मार्च २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील २० निम्नश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०१९ रोजीची तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २५ मार्च २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील ९ लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०१९ रोजीची तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

* * * * * *